# स्त्रीमुक्ती चळवळीची आद्य शक्ती —सावित्रीबाई

'स्त्रीमुक्ती' शब्द आजच्या भारतीय जिवनात सर्वत्र प्रचारात दिसतो. १९७५ चें महिला-वर्ष गेल्या-नंतर ह्या शब्दाचा अधिक वापर येथील जीवनात झालेला दिसून येतो. पाश्चात्य देशांतून ह्या शब्दाची उसनवार झाली असं बोललं जातं. विशेषत: संपूर्ण भारतातील सजग स्त्रियांनी ह्या चळवळीला जोर दिलेला आहे तेव्हा 'स्त्री-मुक्ती' ह्या शब्दाचा अर्थ विश्लेषणात्मक रितीने पाहणे आवश्यक आहे. 'स्त्री' किंवा नारी किंवा महिला अथवा औरत ह्या सर्व स्त्रीवाचक शब्दांना जसा लिंगदर्शक संकेत आहे; त्याचबरोबर त्या संकेताशी जुळलेला एक लक्षणिय अर्थदेखील आहे आणि तो आहे गौण स्थान किंवा क्र. २ चा घटक. दोन्ही समान गरजेच्या वस्तूंना क्रमांकाचे अनुक्रम कसे लावता येतील? परंतु संपूर्ण जगात हे क्रम लावण्यात आलेले आहेत. ह्याची सुरवात केव्हा व कशी झाली हे कळत नाही. परंतु एवढे मात्र खरे की जेव्हापासून भटके जीवन स्थिर करून स्त्रीनं मानवी आयुष्याला एक वेगळी कलाटणी दिली. संस्कृती व सभ्यतेच्या दिशेनं जेव्हा ती वाटचाल करू लागली तेव्हा तिला आपले स्वातंत्र्य गमवावे लागले. गौण स्थान स्विकारावे लागले व समतेला मुकावे लागले, समान हक्कांना तिलांजली द्यावी लागली. आजही रानावनातल्या आदिवासी जीवनात स्त्रीचं स्थान पुरुषाइतकंच महत्वाचं आहे आणि ती बरीच स्वतंत्र आहे. आजच्या युगात 'स्त्री' शब्दाचा अर्थ कालच्या 'उपभोग्य वस्तू'शीही सुसंगत आहे. नव्हे आपल्या मनाला येईल तेव्हा हाताशी लागणारी गंमतीची, मौजेची वस्तू, हवे तितकी मुले देणारं यंत्र. अमेरिकेतील बलात्काराचं प्रमाण पाहिलं की 'स्त्री'ला काही इच्छा-अनिच्छा असतात याकडे दुर्लक्ष करायचे, तिची शारीरिक मानसिक अवस्था कशीही चुरगाळून टाकायची, कितीही मनमानी करायची. स्त्रीमुक्तीचे विचारही फोल वाटू लागतात. तेव्हा या सर्व संदर्भातून काही सुटकेचा विचार होऊ शकतो का यातून 'मुक्ती' हा शब्द प्रचलित झाला. मुक्ती म्हणजे सुटका. 'मुक्ती' या शब्दाचा अर्थ काही बुद्धिवंत 'स्वैराचार' असा करतात आणि शब्दच्छल करण्यासाठी काही विदुषीदेखील ह्या पुरुषी अर्थाला साथ देतात आणि सरळ सांगतात, आम्हाला 'मुक्ती' नकोय. 'मुक्ती' शब्दाचा अर्थ सर्व प्रकारच्या जाचक बंधनातून— जी बंधने पुरुषप्रधान संस्कृतीनं लादलेली ती अन्यायकारक बंधने, ज्यांनी स्त्रीवर अन्याय केलेला आहे, तिला आपण माणूस आहोत हे विसरायला लावलं व तिला मानसिक व बौद्धिक गुलामगिरीत जखडून टाकलं. या सर्व प्रतिपादनाचे तात्पर्य असे की, 'स्त्री'ला प्रथम स्वत:विरुद्धच मुक्तीचा लढा द्यायचा, स्वत:च्या कल्पना, धारणा, स्वत:च्या सवयी स्वत:चे संस्कार इत्यादी आणि त्यानंतर पुरुषप्रधान संस्कृतीच्या अन्यायकारक बंधनांचा डोळस जाणिवेने विचार करून त्याविरुद्ध लढा देऊन मुक्ती

मिळवायची आणि ही मुक्ती मिळवताना प्रज्ञेचा तोल कोठेही घसरणार नाही. अनेक वर्षांची उपलब्धी असलेल्या मानवी संस्कृतीला बाधा येणार नाही आणि उगाचच पुरुषांवर अन्यायही होता कामा नये हे भान ठेवून वाटचाल करायला हवी. स्त्री-मुक्तीचा अर्थ व चळवळ व्यापक करण्यासाठी जशी आम्हाला हक्काची जाणीव हवी तशीच कर्तव्याची देखील. आणि सर्वात महत्वाची वैचारिक बैठक हीकी जेव्हा अस्मितेला व मानववादी मूल्यांना जन्म देईल तेव्हा खऱ्या अर्थाने 'स्त्रीमुक्ती' सफल झाली असे समजावे.

जगात सर्वत्र बंधनांच्या भूमिकेत धर्माने फार मोठी कामगिरी बजावलेली आहे. जगातील सर्वच धर्मसंस्थापक हे पुरुष होते. खिस्त किंवा बुद्ध यांनी स्त्रियांविषयी न्याय्य भूमिका घेतलेली असली तरी तिला करुणेचा आधार आहे. अधिकार किंवा हक्क अशी जाणीव त्यात नाही हे खरेच. परंतु स्त्री-मुक्तीच्या विचाराचे देणं देणारेही पुरुषच आहेत हेही खरे. स्वातंत्र्य, समता व न्याय ह्यांची बांधिलकी स्विकारणारे जे विचारवंत आहेत तेच स्त्रियांच्या बाबतीत होणाऱ्या विषमता, अन्याय व परवशता ह्याबद्दल बोलले व आजही बोलताहेत. धार्मिक बांधिलकीमुळे रूढ झालेल्या विषमतायुक्त व अन्यायकारक कल्पनांचा व धारणांचा समाचार घ्यावा लागतो कारण बहुसंख्य समाज हा 'धर्म' ह्या संकल्पनेने झपाटलेला असतो. धर्माची मोहिनी बहुजनांवर असते. त्यातही स्त्रिया या संस्कृती-रक्षक असल्यामुळे धर्मवेडया असतात मग त्या खिश्चन असो, हिन्दू, बौद्ध किंवा मुस्लिम. जगात धर्माचं अशा प्रकारचं, आंधळं करणारं वर्चस्व बहुसंख्य देशात आढळून येतं. पुरुषातही दिसून येतं. स्त्रियात तर अधिक प्रमाणात. आणि म्हणून एखादी स्त्री जेव्हा परंपरा व रूढींच्या विरुद्ध वागते तेव्हा तिची पहिली विरोधक स्त्रीच असते. यावरून एक नित्याच्या अनुभवातले सूत्र तयार होते. स्त्री-मुक्तीच्या विरोधात स्त्रीच प्रथम क्रमांकावरचा शत्रू ठरते. याचं कारण एक दिसतंय की जाणीवपूर्ण शिक्षणाच्या अभावामुळे वैचारिक वृत्ती निर्माण झालेली नाही; शिवाय परंपरागत रूढ संकेतांच्याविरुद्ध जाण्याचं सामर्थ्य शारीरिक वैशिष्टयामुळे, धार्मिक बांधिलकीमुळे, सांस्कृतिक वारशांचे जतन करण्यामुळे; आर्थिक दुर्बलतेमुळे व सुरक्षित आणि स्थिर जीवनाच्या आकांक्षेमुळे स्त्रीमध्ये नसते. म्हणून अन्यायकारक परिस्थितीला ती निरुपायामुळे, भीतीमुळे व दैववादामुळे शरण जाते. अनेकदा कळत असूनही कोंडी फोडण्याचं धैर्य तिच्यात नसतं, मनातून मुक्त व्हावंसं वाटत असूनदेखील तिला होता येत नाही. अशा वेळेस वैचारिक जाणीव देऊन तिच्या बाजूला सामर्थ्यानं कोणी उभं राहिलं तर तिच्यात रूढींच्या बंधनाना झुगारून देण्याचं बळ येतं.

## महाराष्ट्रात स्त्रीमुक्ती चळवळीचा आरंभ

इंग्रजी राजवटीमुळे भारतात ज्या काही चांगल्या-वाईट गोष्टी आल्या त्यात इंग्रजी भाषा व तिच्या माध्यमातून आलेले स्वातंत्र्य,समता, न्याय व बंधुभावाचे विचार. मुलग्रतही विचार करण्याची विश्लेषणात्मक पद्धती. ह्या नवविचारांमुळे तत्कालीन बुद्धिवंत प्रभावित झाले. स्वातंत्र्याची कल्पना 'स्वराज्य' आकांक्षेतून उमटू लागली. तर समता, न्याय व बंधुभाव या कल्पना सामाजिक सुधारणेच्या मार्गाने धावू लागल्या. खरं तर ह्या चारही कल्पना सापेक्ष आहेत, एकाच मार्गाशी संबंधित आहेत, स्वतंत्र नाहीत. असं असताना देखील आपल्या देशातील या संकल्पनांचा अर्थ.

गल्लत लावणाऱ्या मंडळींकडून या संकल्पनांतील वेगळेपणावर भर दिला गेल्यामुळे स्वतंत्र मार्ग झाले व आजच्या परिस्थितीला कारणीभूत ह्या तत्त्वातील गल्लत झालेली आहे. असो. तर आपल्या प्रतिपाद्य विषयाकडे वळताना ह्या विचारवंतांनी जेव्हा भारतीय समाजाचा विचार केला तेव्हा आपला धर्म अनेक उणिवांनी युक्त असून त्यावर आधारलेली समाजरचना विषम व अन्याय असून बंधुभाव कधीच शिरू न देणारी आहे हे लक्षात घेतले. त्यात धर्म-एकता नाही, स्त्री व शूद्र अन्याय्य विषम समाजव्यवस्थेचे बळी आहेत हे विचारात घेऊन लेखनाद्वारे व भाषणाद्वारे विचारजागृतीची प्रक्रिया सुरू झाली. परंतु झाले काय की, लिहिणे किंवा भाषण देणे ज्यांच्याकडून होत होते त्यांच्याकडून कृतीच्या बाबतीत रूढी-परंपरांचीच कास धरली गेली. परिणाम असा झाला की सुधारणा व सुधारणापर विचार उपहासास

पात्र झाले. परंतु लेखन, भाषण व कृती ह्यांचा मेळ साधणारा एक महापुरुष सामर्थ्यानिशी पुढे आला आणि त्याने प्रतिगाम्यांना धडका देणे सुरू केल्याबरोबर उपहासाची जागा क्रोधानं घेतली. हा महापुरुष होता म. ज्योतिराव फुले. त्यांच्या कृतीचा एकमेव आधार होता त्यांची पत्नी सावित्रीबाई. वैचारिक जाणिवेचं सामर्थ्य पाठीशी उभं राहिल्याबरोबर तिनं विषमतेच्या व अन्यायाच्या विरुद्ध बंडाचं निशाण हाती धरलं आणि महाराष्ट्रातील स्त्रीमुक्तीच्या चळवळीची ती अधिष्ठात्री शक्ती बनली. इतरांनी लेखनातून विधवांची स्थिती, बालविवाह, पुर्नविवाह इत्यादीचा उहापोह केला. पण म फुल्यांच्या प्रेरणेने सावित्रीबाईंनी प्रत्यक्ष सर्व सुधारणापर कृती अंमलात आणल्या.

## सावित्रीबाईंचा आगळा बंडखोरपणा

फुल्यांच्या व इतर समाजसुधारकांच्या विचारात व कृतीत एक ठळक फरक लक्षात येतो तो असा की स्त्रियांच्या स्थितीविषयी सर्वांनाच कळकळ दिसते. परंतु ही स्थिती मध्यमवर्गीय पांढरपेशा स्त्रीची आहे, त्यातही ब्राह्मण स्त्रीची अवस्था अधिक विफळ आहे. ज्योतिरावांनी ह्या स्त्रियांप्रमाणेच शूद्र व अतिशूद्र स्त्रीच्या स्थितीकडे लक्ष दिले आणि त्यांच्या असे लक्षात आले की शूद्र व अतिशूद्र स्त्री ही अधिक कचाटयात आहे. जातीय-सामाजिक विषमता, आर्थिक दुर्बलता व स्त्री म्हणून वाटयाला येणारे 'भारतीय स्त्री'चे दुःसह जिणे; हे सारे सुधारायचे असेल तर 'स्त्री'नेच आपली मुक्ती करून घेतली पाहिजे आणि त्यासाठी तिला शिक्षणाची गरज आहे हे जाणून त्यांनी स्त्रीशिक्षणाची चळवळ हाती घेतली. घरूनच याची सुरवात व्हावी कारण 'चॅरिटि बिगिन्स् ॲट होम्' या उक्तीनुसार त्यांनी सावित्रीबाईंना शिकवायला सुरवात केली आणि येथून सावित्रीबाईंच्या बंडखोरीला प्रारंभ झाला. साधारणतः स्त्रिया या जात्याच रूढीप्रिय असतात, आणि सावित्रीबाई ज्या जातीतून व वातावरणातून आलेल्या होत्या ते लक्षात घेतले पाहिजे. पिढयानपिढया चालत आलेल्या संस्कृतीचे अग्रणी भारतात ब्राह्मण वर्गातील लोक असतात. त्यानंतर ते लोण अन्य जातीत पसरते. येथील ब्राह्मण वर्गातील स्त्रियांची स्थिती जेंव्हा दयनीय, ज्ञानशून्य व अन्यायकारक होती तेव्हा इतर जातीतील स्त्रियांबद्दल काय बोलावे ? दुसरे असे की ग्रामीण व शहरी संस्कृतीत आजहा कितीतरी फरक आढळून येतो. सर्व ज्ञानप्रसाराची माध्यमं उपलब्ध असून तीव्रतेने कार्यक्षम असताना जर ही स्थिती आहे तर जवळजवळ दीडशे वर्षांपूर्वी आपल्या देशातील ग्रामीण समाज किती अज्ञानी, रूढीप्रिय असावा ह्याची कल्पना न केलेलीच बरी. सावित्रीबाईंचा विचार करताना एवढया रूढीप्रिय ग्रामीण भागातून आलेली स्त्री उच्चशिक्षण व संस्कृती वातावरणाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना जेंव्हा शिक्षणासाठी प्रयत्न करते, नव्हे शिक्षका ? योग्य पात्रता मिळवते हे आज जरी नवलाचे वाटत नसले तरी त्या काळात भयानक गोष्ट होती. ह्यासाठी ती व्यक्तीच सबल मनाची हवी. कच्च्या मातीचे बांध लवकर नष्ट होणारे असतात. कारण आजही आम्ही बघतो पतीने कितीही पुढारलेल्या कल्पना पत्नीसमोर बोलल्या तरीही 'तुम्ही तुमचं घराबाहेर शहाणपण सांगा,' असं म्हणून बायका अडवत असतात. तेव्हा गुलाम मन व गुलामगिरीच्या विरूद्ध बंड करणारं मन ह्यात मूलतःच फार फरक दिसून येतो हे लक्षात घेतलं पाहिजे. पुरुष कितीही क्रांतीच्या योजना आखत असला तरी त्याची पत्नी त्याला साथ देईलच असे नाही आणि म्हणून पतीला पत्नीची मानसिकता कशाप्रकारे साथ देते यावर त्याचे यश अवलंबून आहे. सावित्रीबाईंचा जेव्हा विचार केला जातो त्यावेळेस त्यांच्या जीवनातील अनेक घटना गुलामगिरीच्या संस्कारांना हादरे देणाऱ्या आहेत असे दिसते.

सावित्रीबाई शाळेत शिकवायला जात. सनातन्यांचे निरनिराळे व्यूह, कधी शेणमारा तर अचकट शिव्याशाप तर कधी गलिच्छ थुंकणे. सहनशीलता ढळली नाही. निमूटपणे सहन करणे चालले होते. पण एक दिवस बाका प्रसंग आला. एक धटिंगण सावित्रीसमोर आला व म्हणाला 'मुलींना आणि महारा-मांगांना शिकवण्याचे तू बंद केले नाहीस तर तुझी अब्रू शाबूत [illegible] नाही.' सावित्रीबाईंना त्याचा एकूण इरादा वाईट दिसल्याबरोबर त्यांनी त्याच्या थोबाडीत लगावल्या. (क्रांति·

ज्योती सावित्रीबाई फुले, पृ.क्र. ९१) 'स्त्री अबला आहे' वगैरे ठोकताळे कसे सपशेल चूक ठरतात याचं एक ज्वलंत उदाहरण. गर्भगळित होऊन मुळूमुळू रडण्यापेक्षा आपल्या सन्मानार्थ, आपल्या अब्रूसाठी दुष्टाची दुर्गती? करणं हे त्या निश्चयी स्वाभिमानी स्त्रीला अधिक महत्त्वाचे वाटले. खानदानीपणाचे सर्व रूढ संकेत झुगारून तिने सनातन्यांना अशाप्रकारे धडा दिला. अर्थातच याला एक आगळीच हिंमत हवी असते. अशीच हिंमत त्यांनी फुलेंना लिहिलेल्या एका पत्रात आहे. हे पत्र त्यांनी आपल्या माहेरावरून लिहिले. यात एक ब्राह्मण व एक महारीण यांच्या प्रेमसंबंधामुळे बिथरलेल्या गावाची हकीगत आहे. (क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, डॉ. माळी., पृ. क्र. ७६)

जातीपातीच्या बंधनांनी आजही ग्रस्त समाजात किती तरी समस्या आहेत. पेशवाईचा अस्त काळ. अवशेष शिल्लक होते. अस्पृश्यांची दर्दनाक स्थिती. आजही उच्चशिक्षित सुसंस्कृत उच्चवर्णीय स्त्रियांमध्ये विषाक्त जाती-बंधन-धारणांचे किडे वळवळताना दिसतात. दीडशे वर्षांपूर्वीचा काळ लक्षात घेता माणुसकीच्या सच्चेपणाने जागून कार्य करणे ही सामान्य गोष्ट नाही.

त्याकाळी अस्पृश्याच्या सावलीने देखील सनातनी विटाळत, थुंकीनेदेखील महाराष्ट्रातील रस्त्यावरची धूळ अपवित्र होत असे त्या जमान्यात अस्पृश्यांना विद्यादान करणे, त्यांच्यासाठी विहीर खुली करून देणे हे सनातन्यांविरुद्ध दंड थोपटणेच होते. कारण समाज-क्रांतीचा पूर्वारंभ यात होता. ज्योतिबांनी सांस्कृतिक क्रांतीची वाट याद्वारे दाखवली. धर्मावर जगणाऱ्या चातुर्वर्ण्यादी सांस्कृतिक कल्पनांना धक्के देऊन शूद्र-अतिशूद्रांची माणूस म्हणून प्रतिष्ठापना करणे, 'शिक्षण घेणे हा प्रत्येक मानवाचा जन्मसिद्ध हक्क आहे,' विद्या विशिष्ट वर्णाची किंवा जातीची मिरासदारी नव्हे. शूद्रातिशूद्रांना विद्येशिवाय तरणोपाय नाही. स्त्रीदेखील विद्येच्या अभावामुळेच मागासलेली आहे. हे ज्योतिबांचे मौलिक द्रष्टेपण प्रत्यक्षात साकारायला सावित्रीबाई पुढे आल्या.

'आम्ही श्रेष्ठ व महारमांग नीच म्हणून स्पृश्या-स्पृश्यता मानणे मूर्खपणाचे आहे...उच्च जाती, नीच जाती ईश्वरकृत नाहीत. स्वार्थी मानवाने स्वतःचे स्वरूप व्यक्त करण्यासाठी आणि त्यायोगे आपल्या वंशजाचे हित व्हावे म्हणून निर्माण केलेले पाखंडी तत्वज्ञान आहे. दुसऱ्या मानवास अस्पृश्य मानणे हे मनुष्यत्वाचे लक्षण नाही म्हणून अस्पश्यतेचा प्रत्येक व्यक्तीने धिक्कार करणे यातच प्रत्येक व्यक्तीचे, समाजाचे किंवा कोणत्याही मानवी संस्कृतीचे परम कल्याण आहे.'

तसेच

'शूद्रांना सांगण्याजोगा आहे शिक्षण मार्ग हा
शिक्षणाने मनुष्यत्व पशुत्व हरते पहा'

(क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पृष्ठ क्र. ५०-५१)

## अलौकिक मुक्त मानवी दृष्टी

सावित्रीबाईंच्या कार्यांचे अनेकविध पैलू दिसतात. त्यांचा विचार करताना त्यांच्यात मानवतेचा जो मुक्त विचार, उच्चार व आचार आहे. त्यामुळे सामान्य व्यक्तीने सहज प्रभावित व्हावे. काही गोष्टी बोलायला सहजसोप्या असतात. पण करायची वेळ आली की खंबीर म्हणवणाऱ्या व्यक्तीदेखील काढता पाय घेतात. आजही पदभ्रष्ट स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन स्त्रियांचा (वैयक्तिक) व स्त्रीसंस्थांचादेखील अतिशय अनुदार दिसून येतो. मानवी उणिवांचा विचार पुरुषांच्या बाबतीत उदारपणे समाज करतो, परंतु त्याच उणिवा स्त्रियांमध्ये दिसल्याबरोबर संपूर्ण समाज टीकास्त्र सोडण्यास सज्ज होतो आणि विशेषतः स्त्रियाच जास्त पुढाकार घेतात. ह्याचे कारण 'स्त्री माणूस आहे, तिच्याही हातून चुका घडू शकतात.' हे मानायची कोणाचीच तयारी नसते. स्त्रीमुक्तीचा रस्तोरस्ती उद्घोष करणाऱ्या आमच्या समाजात आज जर ही स्थिती आहे तर दीडशे वर्षांपूर्वीच्या समाजाला 'स्त्री गायातलं खेटर' असं वाटत असेल तर नवल कोणतं?' 'अष्टवर्षा भवेत् गौरी' म्हणून आठ वर्षांच्या मुलीला चाळीस वर्षांच्या माणसाच्या गळ्यात बांधला जातो, नवरा म्हणजे काय हे कळण्याच्या आतच ती विधवा बनते, संयत जीवन जगण्याचे धरबंद तिला स्वीकारावे लागतात. असहाय स्थितीत जगत असताना केले जाणारे बलात्कार तर कधी तारुण्य सुलभ उत्सुकता, शरीराची गरज इत्यादीतून निर्माण होणाऱ्या गुंतागुतीच्या समस्या. महत्त्वाची

समस्या म्हणजे समाजानं अनैतिक ठरवलेल्या संततीची. समाजाच्या रूढ संकेतामुळे अशी मुले व त्यांच्या आया पापयोनी समजल्या जातात. बहुसंख्य आया ह्या मानहानीच्या प्रसंगातून सुटका करण्यासाठी आपल्या मुलांना मारून टाकत किंवा आत्महत्त्या करून घेत. अशाच प्रसंगातून काशीबाईला फुल्यांनी वाचवलं. सावित्रीबाईंनी तिला हरप्रकारे धीर देऊन तिचं सर्वच केलं. एवढंच नव्हे तर पुढे तिच्याच मुलाला दत्तक म्हणून घेतलं. स्त्रियांच्या साधारण स्वभावानुसार अशा पथभ्रष्ट स्त्रीला आपल्या घरी आणले, म्हणून पतीचे जगणेच तिने मुश्कील करून टाकले असते. परंतु ज्योतिबांबरोबर सावित्रीबाईंचीदेखील मानवी दृष्टीची क्षितिजं विस्तारलेली होती. अन्यथा बालहत्या प्रतिबंधक ग्रहाचे कार्य स्वेच्छेने स्वीकारून चिकाटीने तडीस नेले नसते! आजही अनाथ मुलांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन तुच्छतेचा व हिडीसपणाचा असतो. सावित्रीबाईचे या दृष्टीने कार्य फार महत्त्वाचे व मोलाचे आहे.

प्रत्येक क्षेत्रात ती पतीबरोबर आघाडीवर असायचीच. केशवपनाची प्रथा बंद पाडावी यासाठी न्हाव्याचा संप घडवण्यातदेखील ती सहभागी होती. १८७६ साली घडलेल्या दुष्काळात दुष्काळग्रस्तांना मदत करण्याचं मोलाचं काम तिनं पतीबरोबर पार पाडलेलं होतं. एवढेच नव्हे तर सत्यशोधक समाजाच्या वतीनं चालवण्यात येणाऱ्या छात्रालयाचादेखील कारभार ती बघत असे. खेडोपाडी सत्यशोधक संघटनांच्या वतीनं ती भाषणाला प्रत्यक्ष कार्यात भाग घेत असे. प्लेगच्या साथीत पीडीतांना मदत करणे, दीनदलितांच्या भुकेल्या मुलांना अन्नदान, वस्त्रदान करणे, शेतकरी प्रश्नांवर विचारविनिमय करून त्यांच्या समस्यांना वाचा फोडणे इत्यादी कामे ज्योतिरावांबरोबर सावित्रीबाई तितक्याच प्रखर जाणिवेने करत असत. कामाचे सर्वव्यापीपण हे महत्वाचे वैशिष्टच.

यशवंत हा ब्राह्मण विधवेचा मुलगा असताना देखील त्याच्यासाठी बहुजन जातीची मुलगी पाहून तिचा विवाह त्याच्याशी लावून दिला. हा आंतरजातीय विवाह घडवताना त्यावेळेस समाजातील प्रतिगामी लोकांनी कोणत्या पातळीचा विरोध केला असेल याची कल्पना न केलेलीच बरी. आजही समाजात अशा प्रकारच्या विवाहांना होणाऱ्या प्रखर विरोधाचे स्वरूप पाहिले म्हणजे असे म्हणावेसे वाटते.

सावित्रीबाईंनी ग्रहण केलेल्या शिक्षणाचा उपयोग 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' केलेला दिसतो. तो प्रत्यक्ष कार्याद्वारे, 'काव्यफुलां'तील कवितेद्वारे, सत्यशोधक संघटनांच्या भाषणाद्वारे सर्व माध्यमातून स्त्रियांना व शूद्रांना जागं करण्याचं कार्य, अस्मिता जागवण्याचं कार्य, समाजसेवेच्या कामाची मार्गदिशा दाखवण्याची जबाबदारी फुल्यांबरोबरच सावित्रीबाईंनी स्वीकारलेली आहे. महत्वाचे हे की हे काम आज स्त्री संघटनांद्वारे चालत असतानादेखील एकट्या सावित्रीबाईंनी चालवलेल्या कामाचा जोम व अनेक विधवा त्यात नाहीत हे स्पष्टपणे कबूल करावेसे वाटते. एखाद दुसरं काम केलं की वर्तमानपत्रातून मिळणाऱ्या अमाप प्रसिद्धीच्या पार्श्वभूमीवर जेव्हा सावित्रीबाईंच्या कामांचा ढीग आम्ही बघतो व त्याबरोबरच त्या कामांना साधी वाहवा तर राहू दे पण तीव्र विरोध, गलीच्छ पातळीवरून त्यांच्याप्रत तत्कालीन समाजाने केलेला व्यवहार याची जेव्हा जाणीव होते त्यावेळेस स्त्रीमुक्तीची वाट चोखाळताना ह्या स्त्रीने किती घाव सोसले, किती मानसिक तणाव सहन केले तरी डगमगली नाही. फुल्यांच्या मृत्यूनंतरही ती स्वत: निरनिराळी कामं त्याच उत्साहाने व खंबीरपणे करत होती. हा एक जिवंत आदर्श आहे. म्हणून ती स्त्रीमुक्तीची आद्य शक्ती होय.

महाराष्ट्रातील 'स्त्रीमुक्ती' आंदोलन चालवणाऱ्या स्त्री–संस्थांना समर्थ मार्गदर्शन आपल्या कार्याद्वारे देणारी सावित्रीबाई भारतीय स्त्रियांच्या इतिहासात 'महाराष्ट्रीय स्त्रीमुक्तीची अग्रणी' म्हणून अढळ स्थानी विराजमान होऊन धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक धारणांनी संवेदना बोथट करणाऱ्या मानसिक व बौद्धिक गुलामगिरीच्या कचाटातून स्वत:ही मुक्त होणारी व आपल्याबरोबर इतर स्त्रियांना व शूद्रातिशूद्रांना मुक्त करण्यासाठी धडपडणारी ही अलौकिक सामर्थ्याची स्त्री पिढ्यान् पिढ्या विषम, अन्यायपीडित दुर्बल घटकांना चेतण्याचे, पेटण्याचे बळ, जाणिवा जागवून देत राहील यात शंकाच नाही.

–कुमुद पावडे